# प्रेस नोट दि.१८/०३/२०२४

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची धडक कारवाई

**पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीत सांगवी येथे गांजा, चरस व एल.एस.डी. डॉट पेपर विक्री करणा-या ०५ इसमांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण २०,८९,५००/- रु. किं. चे ०७ किलो २०० ग्रॅम गांजा व १७५ ग्रॅम चरस जप्त करुन गांजा, चरस व एल.एस.डी. डॉट पेपर विक्री करणारे रॅकेट उध्दवस्त केले.**

मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांनी आय.टी.पार्क मध्ये काम करणारे तरुण/तरुणी, उद्योगनगरीमध्ये झपाटयाने होणा-या विकास कामांमध्ये काम करणारा कामगार वर्ग, शिक्षण घेणारे तरुण/तरुणी यांचेवर कामाचे/शिक्षणाचे बोजामुळे तसेच झोपडपट्टी परिसरातील मजुरी करणारे व्यसनाकडे वळुन अंमली पदार्थाचे विळख्यामध्ये पडु नयेत या करीता जनजागृती करणे व कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थांचे अवैध विक्रीवर आळा घालणे करीता व अंमली पदार्थांचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेशीत केले आहे.

त्याप्रमाणे मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, संदीप डोईफोडे सो व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री बाळासाहेब कोपनर सो यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वैभव शिंगारे यांनी सहा पोलीस निरीक्षक सचिन कदम, सहा.पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड, पोलीस उप निरीक्षक ज्ञानेश्वर दळवी, राजन महाडीक यांची पथके तयार करुन त्यांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थांचे अवैध विक्रीवर आळा घालणे करीता व अंमली पदार्थांचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेशीत करुन पेट्रोलिंग नेमली.

त्या अनुषंगाने दि.१७/०३/२०२४ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील अधिकारी व अंमलदार सांगवी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील **पोलीस अंमलदार विजय दौंडकर व प्रसाद कलाटे** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाल्यावरुन अंमली पदार्थ विरोधी पथकाने सापळा लावुन सांगवी पोलीस स्टेशनचे हद्दीतील सांगवी स्मशान भुमीचे विरुध्द असलेल्या एस.टी. कॉलनीचे ग्राऊंडचे कोप-यामध्ये आडोशाला इसम नामे १. ओंकार ऊर्फ सोन्या महादेव लिंगे, वय २६ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र ११ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे २. अनिकेत अनिल गोडांबे, वय २५ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र १२ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे ३. रोहन उत्तम कांबळे, वय २१ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र ०८ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे ४. रुपेश गौतम जाधव, वय २१ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र १५ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे व ५. रोहन ऊर्फ पप्या महादेव लिंगे, वय २४ वर्षे, रा पाच बंगला, एस.टी.वर्क शॉप, घर क्र ११ पी.डब्लु.डी. कॉलनी, दापोडी पुणे यांना ताब्यात घेवुन **त्यांचे कब्जातुन एकुण २०,८९,५००/- रु. किं. चा माल ज्यामध्ये १) ३,६०,०००/- किंमतीचा ७ किलो २०० ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ,२) ४,३७,५००/- किंमतीचे १७५ ग्रम चरस, ३) १,८०,०००/- १२ एल.एस.डी. डॉट पेपर, ०६ मोबाईल, ०१ मारुती सुझुकी स्विफ्ट कार, ०२ ॲक्टीवा व ०१ व्हेस्पा अश्या ०१ चारचाकी व ०३ दुचाकी गाडया जप्त करुन त्यांचे विरुध्द सांगवी पोलीस स्टेशन येथे एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(ब), २२(क), २९** प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कामगीरी ही **मा.पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा.अप्पर पोलीस आयुक्त, श्री.वसंत परदेशी, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, संदीप डोईफोडे सो, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. बाळासाहेब कोपनर,** यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वैभव शिंगारे, सहा.पोलीस निरीक्षक सचिन कदम, पोलीस उप-निरीक्षक ज्ञानेश्वर दळवी, राजन महाडीक, सपोफौ बाळासाहेब सुर्यवंशी, प्रदीप शेलार, पो.हवा. राजेंद्र बांबळे, संतोष दिघे, मयुर वाडकर, पोलीस नाईक विजय दौंडकर, प्रसाद कलाटे, दादा धस, सदानंद रुद्राक्षे, कपिलेश इगवे यांनी केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड